(इंग्रजी मध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[१९९६] २ एस. सी. आर ९१७

श्री-ला-श्री सिवप्रकासा पांडरा संनाधी अवरगल

— विरुद्ध –

श्रीमती. टी. पार्वती अम्मल आणि इतर

फेब्रुवारी २०, १९९६

(न्यायमूर्ति जे. एस. वर्मा, न्यायमूर्ति एन. पी. सिंग आणि न्यायमूर्ति बी. एन. किरपाल)

तामिळनाडू लघु इनाम (निर्मूलन आणि रैयतवारीमध्ये रूपांतरण) कायदा, १९६३:

*पक्षांना मालकी हक्क देण्याची दिवाणी कोर्टाची अधिकारिता- कायद्याखालील तरतुदींच्या अंतर्भावानुसार अवरुद्ध आहे- की नाही.*

*आर. माणिकनायकर – विरुद्ध – ई. एलुमलायनायकर*, **[1995]4** एस.सी.सी **156,** चा आधार घेतला.

*वट्टीचेरुकुरू ग्राम पंचायत - विरुद्ध - नोरी वेंकटरामा डीशिथुलु आणि इतर,* **[*1991*] पुरवणी *2* एस. सी. सी. *228*, विभेद्य करण्यात आले.**

दिवाणी अपीलीय अधिकारिता दिवाणी अपील क्रमांक ५१४१/१९९३.

एस.ए.क्रमांक ८८८/१९७९ मधील मद्रास उच्च न्यायालयाच्या दिनांक १६.३.८७ च्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

एस. बालकृष्णन आणि एस. प्रसाद —- अपीलकर्त्यांसाठी

एस.शिवसुब्रमण्यम, ए. टी. एम. संपत आणि व्ही. बलालजी --- उत्तरवाद्यांसाठी

न्यायालयाचा खालील आदेश देण्यात आलाः

निर्णयासाठीचा एकमेव प्रश्न उत्तरवादींनी दाखल केलेल्या दाव्याची दखल घेण्याच्या दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेशी संबंधित आहे. न्यायचौकशी न्यायालयाने या दाव्यात हुकूमनामा दिला. पहिले अपीलीय न्यायालयाने दिवाणी न्यायालयाचे अधिकारिता अवरुद्ध आहे असा दृष्टिकोन ठेवून, आदेश रद्द केला. विद्यमान उत्तरवादींनी दाखल केलेल्या दुसऱ्या याचिकेत, उच्च न्यायालयाने दिवाणी न्यायालयाचे अधिकारक्षेत्र अवरुद्ध नव्हते असा दृष्टिकोन ठेवून न्याय चौकशी न्यायालयाचा निर्णय आणि हुकूम पुनर्संचयित केला आहे.

प्रस्तुत प्रकरणातील पक्षकारांच्या मालकी हक्का बाबत अभिनिर्णय देण्याची दिवाणी न्यायालयाची अधिकारिता वगळण्याचा युक्तिवाद हा तामिळनाडू लघु इनाम (निर्मूलन आणि रैयतवारीमध्ये रूपांतरण) कायदा, १९६३ च्या तरतुदींवर आधारित आहे. या न्यायालयाने अलीकडील आर. *माणिकनायकर - विरुद्ध - ई. एलुमालियानायकर,* [१९९५] ४ एस. सी. सी. १५६ मधील निर्णयात स्पष्टपणे म्हटले आहे की, पक्षांच्या मालकी हक्का बाबत अभिनिर्णय देणे, दिवाणी न्यायालयाचा अधिकारिता, उक्त कायद्याच्या तरतुदींनुसार अवरुद्ध नाही. प्रस्तुत प्रकरणात आम्ही ज्या कायद्याशी संबंधित आहोत त्या कायद्याच्या तरतुदींवरील या न्यायालयाचा हा थेट निर्णय करणे आहे. अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलाने वत्तैचेरुकुरू ग्राम पंचायत - विरुद्ध - नोरी वेंकटरामा डीशिथुलु आणि इतर, [१९९१] पुरवणी २ एस.सी.सी. २२८ मधील निर्णयाचा आधार घेतला आहे. हा निर्णय आंध्र प्रदेशच्या वेगळ्या कायद्यातील तरतुदींशी संबंधित आहे हे लक्षात घेणे पुरेसे आहे. शिवाय आर. माणिकनायकर प्रकरणात, आंध्र प्रदेश कायद्यातील तरतुदींशी संबंधित हा निर्णय विचारात घेतल्या गेला आणि त्याला विभेद्य करण्यात आले. आर. माणिकनायकर प्रकरणातील या न्यायालयाचा थेट निर्णय लक्षात घेता, या अपीलात कोणतीही गुणवत्ता नाही. याचिका आणि अवमान याचिका फेटाळली जातात. खर्च नाही.

अपील आणि याचिका फेटाळण्यात आल्या.

<u>अस्वीकरण</u>

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".